# बुद्धिबळ

श्रीमद् नामचैतन्य भानुदास
दि. ०४–११–२००८
दैनिक सकाळ, मुंबई यांच्या सौजन्याने

आपल्याला मन:शांती, आनंद हवा असतो. पण जग ते द्यायला बांधील नाही. प्रत्येकाचे विचार, स्वभाव वेगळे. तेव्हा मतभिन्नता असणारंच. खरं तर विविध रंगछटांनी जग रंगलय. हेच तर त्याचं सौंदर्य आहे. आपल्या मनोरंगाशी दुसऱ्याचा मनोरंग मॅच होत नाही म्हणून वाईट वाटून घेण्याचं कारण नाही. प्रत्येकाला वाटतं आपण योग्यच वागतो. त्रास होतो तो इतरांचाच. तो होऊ नये यासाठीच आज मी तुम्हाला बुद्धिबळ सांगणार आहे.आपल्या आयुष्याच्या पटावर बुद्धिबळाचा हा खेळ रंगत असतो. बुद्धिबळ म्हटलं की, दोन तट आलेच. अर्थातच त्यात प्यादी, उंट, घोडे, हत्ती, वजीर आणि राजाही असणारंच. या प्रत्येकाची चालही (स्वभावही) ठरलेलीच असते. खेळात कुणाचा कुणाशी कधी संपर्क येईल आणि कुणाची हार–जीत होईल ते सांगता येत नाही. आपलं जीवनही बुद्धिबळाचा खेळ आहे, असं समजा. अशीही माणसं असतात की तुम्ही कितीही प्रेमाने, आपुलकीने बोला ती टोचून बोलणारंच, वाकड्यात शिरणारंच. हे बुद्धिबळातले उंट समजा. हे तिरकेच चालणार (वागणार). जर अशा व्यक्ती क्वचित प्रसंगी प्रेमाने वागू लागल्या तर निश्चित समजा दाल में कुछ काला है। काही व्यक्ती तुमची चूक असो नसो, तुम्हाला फाडफाड बोलणार. हे हत्ती! सरळ समोरून ॲटॅक. काही व्यक्ती तुमच्याशी अतिशय प्रेमाने वागतात, पण मध्येच विक्षिप्तासारख्या वागतात. हे घोडे! दोन घरं सरळ चालले,की एक घर वाकडं. प्यादी सहसा कुणाच्या वाटेला जात नाहीत. मात्र त्यांच्या टप्प्यात कुणी आलं की त्याला मारतात. काही व्यक्ती सर्वांवरच अधिकार गाजवत असतात. हे पटावरचे वजीर. यांना उभं, आडवं, तिरकं कसंही फिरायची मुभा असते. आपण मात्र राजा बनावं. राजा कधीही धावपळ करत नाही. कुणालाही मारायचा प्रयत्न करत नाही. स्वत:च्या बचावासाठी एखादं घर पुढे, बाजूला किंवा वेळप्रसंगी मागेही सरकतो. तुमच्या जीवनातले हत्ती, घोडे, उंट तपासा. ते तसेच वागणार हे गृहित धरा. तुम्ही मात्र मनाने राजे राहा. म्हणजे तुमची मन:शांती ढळणार नाही.